# मासोळी

## पथनाट्य

--चं.प्र.देशपांडे

सदर पथनाट्य सादर करण्याच्या ठिकाणी एक थारोळ्यासारख्या वेड्यावाकड्या आकाराचा लाल रंग लावलेला पुठ्ठा.

१ : अरे, इकडे या, हे बघा, हे बघा.
२ : ( धावत येत -- ) काय ? काय ?
१ : हे काय ! हे नाही दिसत ? हे बघा, इथं --
( थारोळे दाखवत --) हे ! ( चहूकडून काहीजण धावत येतात.)
इतर : काय ? काय आहे ? काय झालं ?
१ : हे -- हे - थारोळं --
२ : हा तर लाल रंग लावलेला पुठ्ठा आहे साधा !
१ : ते बरोबर आहे, पण हे एक रक्ताचं थारोळं आहे असं समजा --
२ : का ? कुणाच्या रक्ताचं ?
१ : म्हणजे मग तुम्हाला जरा वेळानं, वाहत्या रक्ताचं थारोळं कसं तयार होते ते समजेल !
इतरांतला : काय चाललंय ? कुणाचं रक्त ? बॉडी कुठाय ? पोलिसांना बोलावलं पाहिजे --
१ : बोलवू, बोलवू -- पण हे खऱ्या रक्ताचं थारोळं नाहीय -- त्यामुळं नाटकातल्या पोलिसांना बोलवू -- हे चाललं आहे एक पथनाट्य--'मासोळी '--आत्ता इथं आम्ही सादर करतोय एक पथनाट्य -- 'मासोळी'--
२ : पथनाट्य -- रक्त -- मासोळी -- काय आहे काय हे ? --
१ : पथनाट्याचं नाव आहे ते -- ' मासोळी. '
२ : मग यात रक्ताचा संबंध काय ?
१ : रक्ताचे संबंधच तर फार महत्त्वाचे असतात बाबा, ते असे रस्त्यावर कसे दाखवता येतील ?
२ : म्हणजे महत्त्वाचं ते सगळं वगळून तुम्ही हे दाखवणार -- कारण तुम्ही हे रस्त्यावर दाखवताय --
१ : तुम्हाला काय बघण्यात इंटरेस्ट आहे ते कळलं आम्हाला ! तुम्ही तर हे अवश्य बघा - उपयोगी पडेल--
२ : दाखवा की मग ! --
१ : आपल्या सगळ्यांच्यावर एक फार प्रचंड संकट येतंय -- आलेलं आहे -- ते बऱ्याचजणांना नीट माहितीही नाही -- म्हणून तर हा खटाटोप !
२ : संकट ? कसलं संकट ?
१ : तेच तर सांगतोय.( इथे डोक्याला लाल रुमाल बांधलेली मुलंमुली येतात. सगळे मिळून, नाचत नाचत, खालील गाणे म्हणतात ) --

संकट संकट संकट
तुमच्यावर, माझ्यावर
यांच्यावर, त्यांच्यावर,
आलंय बिकट संकट ...
संकट संकट संकट
कुणाच्या रक्ताचा नूर निराळा
कुणाच्या रक्ताची धाव निराळी
पहाट, सकाळ, दुपार सोडा, पण
वेगळंच काही संध्याकाळी...
वेगळंच काही संध्याकाळी ...

२ : संध्याकाळी काय वेगळं असतं ?
१ : तू अजून लहानच दिसतोयस -- हे कळाल्यानंतरच मतदानाचा हक्क येतो --

२ : म्हणजे लोक जरा इकडंतिकडं बघत, लपतलपत, गल्लीबोळात घुसतात त्याबद्दल बोलताय काय ?

१ : मतदानाचा हक्क आता बऱ्याच लहान वयात द्यावा लागेलसं दिसतंय - आता या लाल रंगाकडे बघून सांग -- ( मुलंमुली अजून नाचताहेत, ते दाखवत --)-- हे काय आहे ?

२ : त्यात काय ! वाहतं रक्त ! जसं वाहतं पाणी चांगलं तसंच वाहतं रक्तही चांगलं !

१ : आपण बोलतोय माणसाबद्दल -- तर माणसाच्या शरीरातलं हे वाहतं रक्त --

२ : पुरुषाच्या शरीरातलं -- स्त्रीच्या शरीरातलं --

१ : बास, बास -

२ : वाहत्या रक्तात हात धुवून घ्यायला सांगताय का काय ? उलट रक्तानं माखलेले हात धुवायचे असतात --

१ : खुनी माणसांचं बोलताय ! वाईटच ! पण विसरा ! त्यांच्याहून भयानक महाखुनी आपल्या दाराशी उभे आहेत --

२ : महामुनी ? जय देवा !

१ : महामुनी नव्हे, महाखुनी !-- समजा एक लाख अमरीश पुरी, दोन लाख परेश रावल -

२ : कोण, कोण ? पुलीस, पुलीस -- बचाव, बचाव --

१ धावून, ओरडून काही होणार नाही. पोलीस यांना पकडू शकणार नाहीत. कायदा यांना शिक्षा देऊ शकणार नाही कारण हे ज्याचा खून करतील त्याच्याच बरोबर स्वतःही मरतील ! खुनानंतर हे सापडायचा प्रश्नच येणार नाही ! असे खुनी !( एक मुलगी तिच्या डोक्याचा रुमाल सोडून उलटा करून बांधते, तो आतून पांढरा असल्याने आता वर पांढरा रंग. आणखी काही मुलंमुली तसे करतात. आता लाल रंगात मधूनमधून पांढरे रंग फिरताहेत. ) तर या वाहत्या रक्तात हे पांढरे कण कसले ?

२ : स्पष्ट आहे. हे तर शाळेत शिकवतात. या रक्तातल्या पांढऱ्या पेशी. याच रोगाचा प्रतिकार करतात.२रोगजंतू जर का शिरले रक्तात तर याच पांढऱ्या पेशी त्यांच्याशी लढाई करून त्यांना खतम करतात. हे तर माणसाच्या शरीरातलं संरक्षक सैन्यच आहे. पण याचा तुम्ही म्हणता त्या संकटाशी काय संबंध ?

१ : तेच तर सांगतोय.( एक पांढरी पेशी बाजूला घेऊन--) हे काय आहे ?

२ : रक्तातली पांढरी पेशी -- पुढं बोला --

१ : असं जरा अधिक बारकाईनं बघ - काय दिसंतय ?

२ : अरे वेड्या, मुळात ही पेशी एवढी बारीक -- त्यात आणखी बारकाईनं कसं बघणार ?

१ : तरी बघ. सांग.

२ : नाही बुवा , नाही सांगता येत.

१ : एखादा कारखाना दिसतोय का ? हसू नका --

२ : एवढ्या बारक्या पेशीत कारखाना ? नाही दिसत ! मला तरी नाही दिसत -- तुला दिसतोय ?

१ : बरं, जाऊं दे -- ( एक माणूस सूटबूटहॅट घालून हातात छडी घेऊन लगबगीने चाललेला आहे त्याला --) अहो, अहो महाशय, एक मिनिट ! -- फार घाईत दिसताय, थांबा -- इतकी घाई पण अंगाशी येईल -- हे फार महत्तवाचं म्हणजे सीरीयस आहे -- आपली ओळख ?

विव्दान : मला एक विव्दान माणूस म्हणून आख्खा महाराष्ट्र ओळखतो.

१ : विव्दान आहात ! ओ.के. तुम्हाला एड्स माहीत आहे का ?

विव्दान : मला सगळे ओळखतात. मीही अनेकांना ओळखतो. इथले पोलीस कमिशनर माझ्या ओळखीचे आहेत. बरेचसे नगरसेवक मला ओळखतात. अनेक मंत्री माझ्या परिचयातले आहेत. मी लांब गर्दीत बसलेला दिसलो तरी मुख्य मंत्री स्वतः मला जवळ बोलावून घेतात. सध्याच्या पंतप्रधानांशीसुध्दा मी एकदा हस्तांदोलन केलेलं आहे.

१ : म्हणजे तुम्हाला एड्स माहिती दिसत नाही. तुमच्यासारख्या एवढ्या मोठ्या विव्दान माणसालाही याची माहिती नाही ! आश्चर्य आहे ! आणि दुर्दैवही ! माहिती नाही तुम्हाला -- ॲक्वायर्ड इम्युनिटी डेफिशियन्सी सिन्ड्रोम ?

विव्दान : माहीत आहे. मी स्वतः रोमला जाऊन आलोय ! अफाट नगरी !

१ : रोम ? कुठंशीक आली ही नगरी ?

विव्दान : ग्रीसच्या पुढे ! आधी ग्रीस लागतं, मग रोम !

१ : रोम रोम फुलून आलं असेल तुमचं -- मोरासारखं -- अशी नगरी पाहून !

विव्दान : तर ! पण ते काहीच नाही ! पॅरिस । वाह् रे वा ! ती खरी चैनबाज नगरी ! येतायेता, मुख्य म्हणजे, तेही बघून आलो !

१ : मजा आली असेल !

विव्दान : मजा ? मजाच मजा आली !

१ : मग मुंबईत येते की नाही - अशीच -- मजा ?

विव्दान : अरे हे काय विचारणं झालं ? मुंबई आपलीच आहे ! आपण स्वदेशीचेसुध्दा चाहते आहोत !

१ : जय महाराष्ट्र !

विव्दान : तर काय !

१ : तर या मुंबई शहरात, बरं का, नुसतं आपल्या लाडक्या मुंबापुरीत रोज सुमारे सहा हजार लोक, त्यांच्या काही चुकीमुळं वरचं तिकीट बुक करतायत ! आयुष्य घटवून घेतायत स्वतःचं ! आणि यात परतीचा प्रवास नाही ! एकमार्गी वाहतूक !

विव्दान : रोज सहा हजार माणसं ? ह्यॅ ! काय ? कशामुळं ? कसली चूक ? ह्यॅ !

१ : खरं सांगतोय मी.

विव्दान : असे ना का म्हणा ! मला घाबरायचं काहीच कारण नाही. माझ्या वाटेला कुणी जाऊ शकत नाही.

१ : अहो पण तुम्ही जाता ना मुंबईला मजा करायला ? काय करता मजा म्हणजे ?

विव्दान : आता ते काय इथं, चार लोकांत सांगता येतं काय ? ( एकदम संतापून--) तुम्हाला लाज वाटत नाही ? मी असली मजा करतो ? आरोप करता माझ्यावर ? मी ? माझ्यावर ? मी ?

१ : तुम्हाला यांनी तिकडे बघितलंय -- त्यांनी पण -- आणि त्यांनीसुध्दा -

विव्दान : असं ? म्हणजे - म्हणजे --

( मुलंमुली नाचत गाणं म्हणतात. आता डोक्यांवर रुमाल नाहीत.)

मुंबईला जाऊन मजा मजा करतो
मुंबईला जाऊन मजा मजा करतो --
बाटलीची आवड ? -- हाय हाय !
बाईची आवड ? - हाय हाय !
बाया कशा -- टपोऱ्या !
चटकदार - काळ्या नि गोऱ्या !
जिवाची तहान भागवतो
मनाला घडीभर रिझवतो
मुंबईला जाऊन मजा मजा करतो !

१ : विव्दान आहात ! ही अशी मजा फक्त मुंबईतच होत असते असं नाही ! कोल्हापूरलाही होते !

विव्दान : बरोबर आहे, होतेच !

१ : विव्दान आहात !

विव्दान : आहेच ! ' आयसोटोप्सच्या नॉनकेमिकल फॅक्टर्सचे सोलर एनर्जीच्या संयोगाने होणारे मॉलिक्यूलर पृथक्करण ' या विषयावरचा -- म्हणजे ' सूर्य ' या विषयावरचा माझा प्रबंध आख्ख्या जगात गाजलेला आहे.

१ : पण मजा आमच्यासारखीच करता ! एकच !

विव्दान : पण मी चोखंदळ आहे. माझ्या आवडी-निवडींना एक दर्जा आहे. उगीच कुठलेही उकिरडे मी फुकत नाही.

१ : तुमचं आख्खं आयुष्य एका फुंकरीत एकदम कमी करण्याऱ्या गोष्टींचं बोलतोय मी ! आणि यात कुणाचीही ओळख उपयोगी पडत नाही.

विव्दान : नाही, तुम्ही असं काहीच बोलत नव्हता --

१ तुम्हाला ' एड्स ' माहिती आहे का हे नव्हतं विचारलं मी ?

विव्दान : हां, हे विचारलं होतं !

१ : आता आपल्या पिक्चरची मेन स्टोरी सुरू होते -- लक्ष द्या -- ( पुन्हा पांढरी पेशी दाखवत --)

माणसाच्या रक्तातली पांढरी पेशी. ही रोगजंतूंचा प्रतिकार करते. ही नीट पहा ! काही दिसतंय हिच्यात ?

विव्दान : ' एकच प्याला ' नाटकात म्हणतात ना -- " सुधाकर, तुला या प्याल्यात काय काय दिसतंय ? "

१ : नीट पहा. दिसतोय एखादा कारखाना ?

विव्दान : नाही बुवा ! नाही दिसत !

१ : एड्स या महाभयानक -- महाखुनी -- रोगाचे जंतू माणसाच्या शरीरात शिरले की ते रक्तातल्या पांढऱ्या पेशींचा कब्जा घेतात. आणि या पांढऱ्या पेशींमध्ये त्यांच्या पुढल्या पिढ्या तयार करण्याचे कारखाने सुरू करतात. प्रत्येक पांढरी पेशी म्हणजे एड्सच्या जंतूंच्या निर्मितीचा एक कारखानाच बनते !

विव्दान : अहो मग बंद पाडायचे ते कारखाने !

१ : हे कारखाने कोणत्याही उपायानं बंद पाडता येत नाहीत ! जगात याच्यावर उपाय नाही ! औषध नाही ! आणि दुसरं म्हणजे असे कारखाने समजा सुरू झाले आपल्या शरीरात तरी ते सुमारे सहासात वर्षं आपल्याला  कळतही नाही ! माणूस तसा नॉर्मल जगत राहतो.

विव्दान : असं कसं ? काहीतरी लक्षणं दिसणारच ना रोग म्हटल्यावर ? ताप येणं, डोकं दुखणं, थकवा येणं -- काहीच होत नाही ?

१ : तेच तर सांगतोय. एड्सचे जंतू आपल्या शरीरात शिरलेत आणि त्यांची पैदास आपल्या शरीरात वाढत चाललीय हे कळेल अशी कोणतीही लक्षणं दिसत नाहीत.

विव्दान : म्हणजे इकडे आपल्या आयुष्याला चाप बसत चाललेला असतो आणि आपण वेड्यासारखे नुसते हसत राहतो ? मग भयानक आहे ! पण कशाला हे सगळं ! हा जंतू आपल्या शरीरात शिरूच द्यायचा नाही म्हणजे झालं !

१ : तुम्ही, किंवा कुणीही, मुंबईला किंवा कुठंही जाता आणि मजा करण्यासाठी एखादीशी संबंध करता तेव्हा हे घडतं ! त्या दोघांपैकी कुणाही एकाच्या शरीरात हे जंतू असले की ते दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात घुसतातच ! स्त्रीचा योनीस्त्राव आणि पुरुषाचं वीर्य यांच्यातून ते एका शरीरातून दुसऱ्या शरारात जातात. आणि इकडे काय म्हणतो माणूस -- ' मजा आली ! '

विव्दान : म्हणजे मला उद्देशून बोलताय ?

१ : नाही नाही, कुणीही. अहो, नोकरीसाठी शहरात येणारे -- एकटे राहणारे लोक, या बाबतीत कुतूहल जागं झालेली वयात आलेली मुलं, निरनिराळ्या चवी घ्यायची हौस असलेली चैनी माणसं यांना थांबवणार कसं हो ?

विव्दान : ( हलक्या आवाजात -- ) पण मला एक सांगा रक्ताची तपासणी करून घेतली तर कळेल की नाही ?

१ : कळेल, पण तुम्हाला स्वतःला त्याचा काही उपयोग नाही.

विव्दान : म्हणजे कसं ?

१ : समजा हे जंतू नसलेच शरीरात तर काही प्रश्नच नाही, पण समजा असले ते तुमच्या शरीरात तर त्याच्यावर ना काही इलाज, ना काही औषध ! फक्त आपल्या आयुष्याला चाप लागल्याचं तुम्हाला कळेल इतकंच !

विव्दान : मग जाऊं दे ! होईल ते होईल !

१ : पण एक उपयोग होईल. तुमच्यामुळं दुसऱ्या व्यक्तीला या रोगाची लागण होऊ नये याची तुम्हाला काळजी घेता येईल.

विव्दान : तेवढ्यासाठी कोण करणार हा खटाटोप ! आप मरे तो डूब गई दुनिया ! कसली काळजी न् काय !

१ : असं कसं म्हणता, माणुसकी ही जर एक महत्त्वाची प्रेरणा असेल तर शेवटपर्यंत ती महत्त्वाचीच राहील ! (विव्दान जणू स्वतःशीच पुटपुटत अस्वस्थपणे गोल गोल फेऱ्या मारतो -- " मला माझी काळजी वाटतीय -- मला माझी काळजी वाटतीय --" -- असं पुटपुटत,  मग थांबून --)

विव्दान : बरं पण असा रोग झालेल्या पुरुषाचा एखाद्या स्त्रीशी संबंध आला आणि त्यातून ती माता झाली तर ?

१ : तर पहिलं म्हणजे तिला हा रोग लागणार आणि दुसरं म्हणजे तिच्या होणाऱ्या बाळालाही हा रोग असणार -- ते बाळ तीन चार वर्षात मरणार हे नक्की !

विव्दान : च्यायला, अवघड आहे मग ! म्हणजे एखादी अनैतिक वागणारी बायको एरवी तर नवऱ्याला गाळात घालतच असते पण तिला जर अशी बाहेर या रोगाची लागण झाली तर तिच्या नवऱ्याचा पुरता

नायनाटच होणार !

१ : ते आहे -- तसंच एखादा अनैतिक वागणारा पुरुषही बाहेरून हा प्रसाद घरात आणू शकतो ! अर्थात् एवढं एकच कारण असतं असं नाही ! हे लक्षात घ्या ! आणखीही कारणं आहेत ! फक्त हेच नाही !

विव्दान : आणखी कुठली कारणं ?

१ : योग्य तेवढ्या न उकळलेल्या -- म्हणजे उकळल्या नाहीत अशा -- सुया जर गोंदवण्यासाठी, कान टोचण्यासाठी, किंवा इंजेक्शन देण्यासाठी वापरल्या आणि आधी त्यांचा वापर एड्स झालेल्या व्यक्तीसाठी झालेला असला तर हे जंतू शरीरात जाऊ शकतात. तसंच हे जंतू ज्या रक्तात आहेत असं रक्त जर दुसऱ्या व्यक्तीला दिलं गेलं तरी हे होतं !

विव्दान : पण रक्तपेढीवाले लोक रक्त तपासून घेत नाहीत ?

१ : तपासतात. म्हणूनच शक्यतो मान्यताप्राप्त रक्तपेढीतूनच रक्त घ्यावं. तिथे तपासणीची यंत्रणा चोख असते.

विव्दान : शिवाय आता हवेतून, पाण्यातून, अन्नातून, एड्स झालेल्याचे कपडे वापरल्यामुळं, त्यानं वापरलेली भांडी, कपबशा, डिशेस वापरल्यामुळं, उदाहरणार्थ हॉटेलातून -- किंवा सार्वजनिक मुतारीत गेल्यामुळं किंवा तसल्या रोग्याला चावलेला डास किंवा ढेकूण आपल्याला चावल्यामुळंही हा रोग होतो असं सांगून टाका, म्हणजे प्रश्नच मिटला !

१ : नाही, तुम्ही आता सांगितलंत तशा कारणांनी किंवा तशा संसर्गानं हा रोग होत नाही. याचं मुख्य कारण म्हणजे एड्सचा हा एच.आय.व्ही नामक जंतू फक्त माणसाच्या शरीरातच जिवंत राहू शकतो.. माणसाच्या शरीराबाहेर आला की लगेच तो मरतो. मासोळी जशी फक्त पाण्यातच जिवंत राहते आणि पाण्याबाहेर काढली की मरते तसंच आहे हे .( मुलंमुली खालील गाणे म्हणतात )

मासोळी जगते पाण्यात
एड्स मानवी रक्तात
माणूस हीच यांची कर्मभूमी
इथेच फक्त यांच्या जगण्याची हमी.
रक्ताचे नाते यांचे माणसाशी
इतरत्र कुठेही मरतात हे उपाशी
खाल्ल्या घरचे वासे मोजणारी ही जात
दात्याला मारून स्वतःही मरणाऱ्या वैऱ्याची ही रात
म्हणूनच
हा एकच घोष करतो आम्ही गाण्यात
मासोळी जगते पाण्यात
एड्स मानवी रक्तात ...

१ : म्हणूनच इतर कुठलेही संसर्ग नाहीत. हा जंतू डासाच्या शरीरात गेला की लगेच मरतो.हा फक्त माणसाच्या रक्तातच जगतो.

विव्दान : डायलेसिस करून सगळं रक्तच बदलून घेता येईल काय ? काहीही येवो खर्च !

१ : पहिल्या रक्ताचा स्पर्शही न होता दुसरं रक्त भरणार कसं ? आणि अर्थात पहिलं रक्त सगळं काढावं तर मरतोयच की हो माणूस !

विव्दान : म्हणजे एखाद्या शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रीचा एड्स झालेल्या माणसाशी संबंध आला की तिलाही हा रोग जडणार.

१ : बरोबर.

विव्दान : आणि हे साताठ वर्ष कळणारही नाही. तिचा रोजचा व्यवसाय चालू राहणार. आणि रोज येणाऱ्या सगळ्यांना हा रोग लागत जाणार. ते पुन्हा दुसऱ्या अशा स्त्रियांकडे गेले की त्याही स्त्रियांना हा रोग जडणार. मग त्याही असाच तो पसरवत राहणार.

१ : बरोबर !

विव्दान : त्यातले लग्न झालेले लोक, शरीरसंबंधातून आपापल्या बायकांनाही हा रोग लावणार !

१ : शंकाच नाही !

विव्दान : ( स्वतःशीच --) मला भीती वाटतीय, मला भीती वाटतीय, मला भीती वाटतीय, मला भीती वाटतीय...

(गोल गोल फिरत राहतो ) .

१ : थांबा, असं नुसतं भिऊन काय होणार ?

विव्दान : हे रोग पसरण्याचं चक्र आता फारच मोठं झालं असणार ! आणि रोज त्याचा आकार वाढतच जाणार ! बाप रे ! वाटोळं होणार आता !

१ : असं एकदम म्हणू नका. अमेरिका या देशानं लोकांमध्ये या रोगाबद्दलच्या ज्ञानाचा प्रसार करून याच्यावर काबू आणलेला आहे -- हे लक्षात घ्या.

( रोमिओटाईप, मुखवटा घातलेला एक तरुण उठून तावातावाने बोलू लागतो -- )

तरुण : काही गरज नाही ! ही सगळी मौजमजा जर बंद करायची असेल तर जगायचंच कशाला मग ! आत्महत्याच करून टाकावी ! ( इथे मुखवटा घातलेली, शांत, सोज्वळ टाईप एक तरुणी येते.)

तरुणी : गुंड, बलात्कारी, समाजात अनीती पसरवणारे, स्वतःच्या सुखासाठी दुसऱ्यांवर अन्याय करायची प्रवृत्ती असलेले -- अशा सगळ्यांच्या विरुध्द ही दैवी शक्ती उभी राहिलेली आहे. या शक्तीशी ते मुकाबला करू शकणार नाहीत ! माजलेल्या लोकांना वठणीवर आणणारी दुसरी कुठलीही शक्ती या जगात राहिलेली नाही म्हणूनच निसर्गानं हे अस्त्र सोडलेलं आहे.

१ : असं म्हणा हवं तर, पण याचं उदात्तीकरण करू नका. ते महागात पडेल. लक्षात ठेवा. काही निरपराध लोकांनासुध्दा याची लागण झालेली आहे, होणार आहे. हा रोग झालेले सगळे वाईटच आहेत असं म्हणू नका.

तरुण : मला निरनिराळ्या स्त्रियांकडे गेल्याशिवाय जगताच येणार नाही. म्हणजे एकतर घुसमटून वेडे होऊन जगा किंवा या रोगासह जगा -- एवढीच निवड मी करू शकतो.

१ : हे फक्त अर्धसत्य आहे. अशा ठिकाणी जायचंच झालं तर प्रत्यक्ष संबंधाच्या वेळी निरोधसारखा कोणताही प्रतिरोधक वापरला तर बचाव होऊ शकतो. हमखास बचाव ! डीलक्स प्रतिरोधक उत्तम !

तरुण : ( शांत होत --) मग ठीक आहे.

दुसरा तरुणः एका फुटबॉलपटूला खेळातून निवृत्त व्हावं लागलं कारण तो एड्सचा रोगी होता आणि इतर खेळाडूंनी अशी तक्रार केली होती की खेळात होणाऱ्या जखमा किंवा खरचटणे एकमेकांना लागून हा रोग पसरू शकेल !

१ : बरोबर आहे हे.

दुसरा तरुणः म्हणजे मग अशाची नोकरीही जाणार का काय ? होतं काय पण ॲक्युअली या रोगात ?

१ : रक्तातल्या पांढऱ्या पेशी हळूहळू निकामी होत जातात. आणि त्यामुळं माणसाचा रोगप्रतिकारच कमकुवत होत जातो. पांढऱ्या पेशींचं संरक्षण सैन्य खतम झाल्यामुळं कुठल्याही रोगजंतूंचं आक्रमण थोपवलंच जात नाही. आणि मग साध्या सर्दीनंसुध्दा माणूस हवालदिल होऊ शकतो. फ्लू , मलेरिया,टीबी,न्यूमोनियावगैरे हे सगळे असतातच. यातला कुठलाही रोग, अटकावच नसल्यानं, प्राणघातक ठरू शकतो.

विव्दान : देशातल्या सगळ्यांची रक्ततपासणी केली पाहिजे !

१ : एक तर ही अतिशय खर्चिक बाब आहे. आणि दुसरं म्हणजे आज रक्त तपासणी झाली तरी उद्या हा रोग लागू शकतोच !

विव्दान : निदान लग्नाच्या आधी तरी बधूवरांची अशी रक्ततपासणी झालीच पाहिजे !

१ : हं, हे ठीक आहे. या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी जे जे करता येईल ते ते सगळं केलंच पाहिजे. नाही तर पुढेपुढे रोज हजारोंनी, लाखोंनी, माणसं या रोगानं ग्रस्त होण्याचा धोका आहे.

विव्दान : ( स्वतःशीच -- ) मला भीती वाटतीय...मला भीती वाटतीय...( गोल गोल फिरतो. मुलंमुली खालील गाणे म्हणतात --)

वापरा प्रतिरोधक शंकास्पद ठिकाणी
लग्नाआधी करा रक्ततपासणी
सुया वापरा उकळून, रक्त अधिकृत घ्या
फाटलेल्या गगनाला घाला गवसणी

१ : या रोगामुळं सामाजिक, नैतिक, मानसिक, आर्थिक आणि इतरही अनेक क्षेत्रांत बरेच प्रश्न तयार होणार आहेत. चुटकीसरशी उत्तरं देणाऱ्यांचं हे काम नाही. नीट विचार करावा लागेल. नुसती दूषणं देणं शहाणपणाचं ठरणार नाही. दुसऱ्यांना वाईट म्हणणारे काही स्वतःही या रोगाचे वाहक असण्याची

शक्यता आहे.

विव्दान : वाहक ?

१ : ज्याच्या शरीरात या रोगाचे जंतू आहेत तो माणूस या रोगाला पूर्ण बळी पडेपर्यंत याचा वाहकच असतो. त्याच्यापासून तो रोग पसरू शकतो.

विव्दान : ही काय भूमिगत चळवळ आहे का काय !

१ : होय. या भूमिगत चळवळीला उघडं पाडावं लागेलं. तिची उघड्यावर चर्चा करावी लागेल. मुलामुलींना तिच्याशी सामना करण्याचं शिक्षण द्यावं लागेल. नैतिक दांभिकपणा फेकून द्यावा लागेल ! ( इथे मुलंमुली खालील गाणे म्हणतात -- )

गरीब - श्रीमंत, मंत्री-मतदार

अडाणी - सुशिक्षित, पोलीस - गुन्हेगार

एचआयव्ही एड्सला नाही भेदभाव

सर्वांवर एकच विध्वंसक घाव ...

सर्वांवर एकच विध्वंसक धाव ...

विव्दान : मी जरा गडबडीत आहे. मी जातो आता.

१ : मला माहीत आहे, तुम्ही रक्तपासणी करून घ्यायला चाललेले आहात. तुम्हाला खात्री करून घ्यायचीय. कारण तुम्ही इकडेतिकडे मजा केलेली आहे. चला, मी येतो तुमच्याबरोबर. ( दोघेही जातात. नंतर विव्दानाच्या घरातले दृश्य. विव्दान आणि त्याची पत्नी दोघेही मुखवटे घातलेले.)

पत्नी : बोलत का नाही तुम्ही ? असं का वागताय हल्ली ? कसले विचार करत असता ?

विव्दान : आहे असाच एक प्रश्न. त्यावर तुझ्याशी बोलावं की नाही हाच विचार करत होतो. बोलणंच ठीक होईल असं वाटतंय.

पत्नी : बोला नं मग -- असं मनात धरून बसू नका --

विव्दान : निदान तुझ्याशी तरी बोललंच पाहिजे. मी काय सांगतोय ते नीट ऐक. पण शांतपणे ऐक. धक्का बसून घेऊ नकोस. कारण जे आहे ते आहे. आणि आता त्याला इलाज नाही.

पत्नी : म्हणजे ?

विव्दान : आता जी काय चूक झालेली आहे त्यात काहीच बदल होऊ शकणार नाही. माझ्यात एड्स या रोगाचे जंतू आहेत. माझ्या रक्तपासणीतनं हे स्पष्ट झालेलं आहे. आणि याचा अर्थच तुलाही आता ही बाधा झालेली असणारच आहे. आपलं दोघांचंही आयुष्य आता घटणार आहे. शरीर संबंधांतून हे जंतू पसरतात आणि याच्यावर औषध नाही.

पत्नी : का -- म्हणजे -- असं कसं झालं ?

विव्दान : तू म्हणशील की हे सगळं माझ्या स्वार्थीपणामुळं आणि सुखलोलुपतेमुळं झालं -- पण हे मी असं ऐकून घेणार नाही -- याला तूही जबाबदार आहेस --

पत्नी : मी ?

विव्दान : सारखे मतभेद आणि वाद ! त्यांची फळं आहेत ही ! आपल्यातल्या नेहमीच्या भांडणांमुळं मला हळूहळू तुझं आकर्षण वाटेनासं झालं ! घटस्फोट घेतला नाही म्हणून आपण एकत्र राहात होतो एवढंच ! अशा परिस्थितीत मी माझ्या नैसर्गिक शारीरिक भुकेचं काय करणार ? अर्थातच मी नको त्या ठिकाणी जात राहिलो. आणि या रोगाच्या अज्ञानामुळं माझ्याकडून काळजीही घेतली गेली नाही. तूही जबाबदार आहेस ! एकमेकांसाठी योग्य नव्हतोच आपण -- म्हणूनच एकमेकांना या नाशाच्या मार्गाला ढकललं आपण --

पत्नी : तुम्ही बेजबाबदार आहात...क्रूर आहात...

विव्दान : तू संतापानं काय म्हणावंस हा तुझा प्रश्न आहे. पण आता काहीच उपयोग नाही.

पत्नी : आता मुलांना तोंड कसं दाखवणार ? नातेवाईकांना काय सांगणार ? चार लोकांत कसं वावरणार ? ( रडायला लागते.) ...विध्वंस झाला सगळा...

विव्दान : याच्यावर मी विचार केलेला आहे. या रोगाचा परिणाम सुरू व्हायला अजून काही काळ लागेल. कुणाला काही कळणार नाही. गप्प राहू. आपण अगदी एकमेकांचे शत्रू असलो तरी ही गुप्तता राखण्याच्या बाबतीत एकनिष्ठ राहावं लागेल आपल्याला ! शेवटी कळेल तेव्हा कळेल !

पत्नी : शेवट घाणेरडा होणार माझा...( रडतच...) तुमच्यामुळं...

विव्दान : ते ठीक आहे. फक्त उरलेलं आयुष्यही घाणेरडं करू नकोस म्हणजे झालं ! विसर सगळं !

पत्नी : औषध ? नाहीच ?

विव्दान : सध्या तरी नाही. कधी सापडेल काय माहीत !

पत्नी :: म्हणजे सती जाण्याची प्रथा आता वेगळ्या मार्गानं पुन्हा सुरू होतेय ...
एवढा विव्दान माणूस ! वाटलं नव्हतं असा असेल !

दुसरा : सगळ्या मोठ्या लोकांशी ओळख होती त्याची !

तिसरा : पैशाची ददात नव्हती.

एकजण : मुख्यमंत्री त्याच्या घरी यायचे.

दुसरा : पोलीस त्याला सलाम करायचे.

तिसरा : सातबाराचे उतारे त्याला पटकन आणि घरपोच मिळायचे.

दुसरा : विव्दान त्याचा आदर करायचे.

एकजण : टीव्हीवर त्याची मुलाखत घ्यायचे.

तिसरा : वर्तमानपत्रांत त्याचे फोटो यायचे.

तिघेही : ( माना खाली घालून, शोकमग्नपणे, धिम्या लयीत --) पण...तो... मूर्खपणानं...वागला...

१ : आता कळलं ?-- सुरुवात रक्ताच्या थारोळ्यानं का केली ते ? अहो, प्रतिकारशक्ती गमावलेलं रक्त म्हणजे वाहत्या रक्ताचं थारोळंच नाही का ? ( मुलंमुली खालील गाणं सुरू करतात -- )
एड्स वर नाही इलाज हे ध्यानात घ्या
याच्यावर करायची मात हे मनात घ्या
निर्धारच आपला करेल संकट हे पार
यातच आहे पुढीलांचे हित अपार...

सर्वजण : या एड्सच्या संकटाचा जिद्दीनं सामना करा ! योग्य काळजी घेऊन याला अटकाव करता येतो ! हे टाळता येतं ! याला बळी पडू नका ! जागे व्हा ! जागे व्हा ! जागे व्हा !

-0-0-0-

सूचना -- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

लेखक : चं. प्र. देशपांडे
३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर,
वीर सावरकर पथ, सहकारनगर नं.२
पर्वती, पुणे - ४११००९

**दूरध्वनी : ४२२ ७८४७.**